(17)

(3)

~~40~~ 44

Annex B2

सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणा-या दरडोई परिरक्षण (परिपोषण) अनुदानात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- विभशा-२००६/प्र.क्र.११५/मावक-६,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ मे २००८.

वाचा :- १) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.व्हीजेडब्लू-१०९०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-१/मावक-६, दि.२४ सप्टेंबर १९९१.
२) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.व्हीजेडब्लू-१०२०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-२/मावक-६, दि. ९ ऑक्टोबर १९९१.
३) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.व्हीएएस-१०९४/प्र.क्र.१७६/मावक-६, दि.२५ जुलै १९९६.
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.विभशा-२००१/प्र.क्र.५९/मावक-६, दि. २० नोव्हेंबर २००२.
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विभशा-२००६/प्र.क्र.११५/मावक-६, दि.९.२.२००७.

प्रस्तावना :- स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या सामाजिक न्याय विभागातील आश्रमशाळा / वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा यामधील निवासी विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणा-या परिपोषण अनुदानात एकसूत्रता रहावी व सदर दर ग्राहक मूल्य निर्देशांकानुसार देण्यात यावा ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असणा-या विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या व अनुसूचित जाती / जमातीच्या आश्रमशाळांमधील निवासी विद्यार्थ्यांसाठी (रु.६००/- असा दर दि. १.४.२००७ पासून करण्यात आला आहे.) या सर्व अनुदानित आश्रमशाळा, वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा यामधील निवासी विद्यार्थ्यांच्या भोजनावरील खर्च भागविण्यासाठी परिपोषण अनुदानात वाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :- स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या सामाजिक न्याय विभागातील आश्रमशाळा / वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा यामधील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा दरडोई रु.६३०/- असा परिरक्षण (परिपोषण) दर दि. १.४.२००८ पासून लागू करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर दर खालील संस्थांच्या आश्रमशाळा, वसतीगृहे, अपंग संस्थांच्या शाळा, वृध्दाश्रम, यांच्यासाठी लागू रहातील.परिरक्षण (परिपोषण) अनुदानाचा दर प्रत्येक वर्षी ग्राहक मूल्याशी निगडित इतका सुधारित करण्यात यावा.

| क्रमांक | संस्थेच्या प्रकार |
|---|---|
| १ | विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा |
| २ | उसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा |
| ३ | अनुसूचित जातीच्या अनुदानित प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा |
| ४ | मागासवर्गीय मुलामुलींची अनुदानित वसतीगृहे |
| ५ | अपंग संस्थांच्या शाळा (विशेष शाळा / कर्मशाळा) |

| | |
|---|---|
| ६ | मतिमंद मुलांसाठी शाळा |
| ७ | अस्थिव्यंग मुलांसाठी शाळा |
| ८ | बहिरे व मुके यांच्याकरिता असलेल्या शाळा |
| ९ | अंध मुलांसाठीच्या शाळा |
| १० | वृध्दाश्रम |

परिपोषण अनुदानात वाढ केल्यामुळे देय होणारे अनुदान वितरित करण्यापूर्वी वरील सर्व संस्थेमध्ये निवासी विद्यार्थ्यांची संख्या योग्य आहे किंवा कसे, पटावर दर्शविण्यात आलेले निवासी विद्यार्थी संस्थेत नेहमी उपस्थित असतात किंवा कसे याची पूर्ण तपासणी करुन पटलावरील निवासी विद्यार्थी संख्या योग्य असल्याची खात्री करावी तद्नंतरच परिपोषण अनुदान वितरित करण्यात यावे अशा स्पष्ट सूचना संचालक,विमुक्त जाती, भटक्या जमाती / संचालक,समाजकल्याण / आयुक्त, अपंग कल्याण यांनी सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी व सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना द्याव्यात.

२. या बाबींवरील खर्च त्या त्या संस्थांच्या आश्रमशाळा, वसतीगृहे, अपंगांच्या शाळा / कर्मशाळा, वृध्दाश्रम यासाठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. त्यासाठी आवश्यक वाढीव तरतूद संबंधित योजनेच्या लेखाशिर्षाखाली संबंधितांनी उपलब्ध करुन घ्यावी.

३. सदर शासन निर्णय, नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४४/०८/व्यय-१४, दि.२७.३.२००८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००८०५२७०९३१३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एन. आरुमुगम)
सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति :-
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, विधान भवन, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे.

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे,
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे,
विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक / पुणे / औरंगाबाद / नागपूर,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,
महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
सर्व मंत्रालयीन विभाग,
सह संचालक,लेखा व कोषागारे, संगणक कक्ष. नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला (२ प्रती),
वरिष्ठ लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व जिल्हे),
सर्व लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,
सर्व कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई,
निवड नस्ती, का-मावक-६ .